जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

प्रेसनोट क्रमांक -६८९ दिनांक - १३/०९/२०२३

**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**

## दुचाकी चोरणारे व घरफोडी करणा-या आरोपीं कडुन चोरीच्या एकुण १४ दुचाकी वाहने व घरफोडीतील सोने व रोख रक्कम असा एकुण ७ लाख रु.किंमतीचा मुददेमाल हस्तगत,करुण एकुण १२ गुन्हे उघडकीस

मुंढवा पो.स्टे.गु.र.नं.३०२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ मधील चोरीस गेलेली स्प्लेंडर प्लस मो.सा. वाहनाचा व अज्ञात आरोपींचा तपास पथक प्रमुख श्री.संदीप जोरे व स्टाफ हददीत गस्त करीत शोध घेत असताना तपास पथकातील अंमलदार दिनेश भांदुर्गे व सचिन पाटील यांना त्यांचे गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की दोन मुले संशयीत रित्या काहीतरी अपराध करण्याचे इराद्याने चोरीची दुचाकी घेवुन साज कंपनी जवळ घोरपडी गाव या ठिकाणी फिरत आहेत.सदरबाबत वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विष्णु ताम्हाने यांना कळविल्यानंतर त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

बातमीप्रमाणे तपास पथकातील अधिकारी अंमलदार यांनी सदर ठिकाणी जावुन संशयीत आरोपीस थांबवुन त्यांचे ताब्यातील मोटार सायकल बाबत त्यांनी खात्रीलायक माहीती न दिल्याने त्याबाबत संशय आला असता त्यांचे ताब्यातील वाहन हे मुंढवा पोलीस ठाणे गु.र.नं.३०२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ मधील चोरीस गेलेली स्प्लेंडर प्लस असल्याचे निष्पन्न झाले.सदर वाहनावरील आरोपी नामे गोरख विलास धांडे, वय-२० वर्षे, रा.शिवशंभो नगर,लेन नं.४,इस्कॉन मंदीर चौक,गोकूळ नगर, कात्रज,पुणे व त्याचा साथिदार विधीसंघर्षित बालक याचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांचेकडुन एकुण १४ दुचाकी चोरल्याचे निष्पन्न झालेने ते जप्त करुन त्यांचेकडुन कोंढवा पोलीस ठाणे हददीतील घरफोडीतील सोने व रोख कॅश असा **एकुण ७,०००.००/- रु (७ लाख रु.) चा मुददेमाल** जप्त करण्यात आला आहे.जप्त करण्यात आलेल्या विविध कंपन्यांच्या १४ दुचाकी गाडयांपैकी ११ गाडयांबाबत पुणे शहर व परीसरातील पोलीस ठाणेत गुन्हे दाखल असुन इतर ०३ जप्त वाहनांबाबत अधिक तपास सुरु आहे.वरील गुन्हे हा अटक आरोपी व त्याचा जोडीदार विधीसंघर्षित बालक यांनी केले आहेत.अटक आरोपी नामे **गोरख विलास धांडे,वय-२० वर्षे, रा.शिवशंभो नगर,लेन नं.४,इस्कॉन मंदीर चौक,गोकूळ नगर, कात्रज,पुणे असे असुन** त्याचेवर घरफोडीचे ०२ गुन्हे दाखल आहेत.

अटक आरोपी व त्याचा साथिदार विधीसंघर्षित बालक यांचेकडुन खालीलप्रमाणे वाहने जप्त करण्यात आलेली असुन सदरबाबत विविध पोलीस ठाणेस दाखल गुन्हे खालील प्रमाणे आहेत.

| अ क्र | पोलीस ठाणे | गुर नं व कलम |
|---|---|---|
| १ | मुंढवा | २२४/२०२१ भादवी ३७९ |
| २ | मुंढवा | २९५/२०२३ भादवी ३७९ |
| ३ | मुंढवा | ३०२/२०२३ भादवी ३७९ |
| ४ | हडपसर | १२८२/२०२३ भादवी ३७९ |
| ५ | वानवडी | ४६/२०२३ भादवी ३७९ |
| ६ | वानवडी | ४२६/२०२३ भादवी ३७९ |
| ७ | वानवडी | ४३३/२०२३ भादवी ३७९ |
| ८ | सिंहगड रोड | ५४७/२०२२ भादवी ३७९ |
| ९ | राजगड पो ठाणे पुणे ग्रामिण | ४६१/२०२३ भादवी ३७९ |
| १० | लोणावळा शहर ठाणे पुणे ग्रामिण | ३४३/२०२३ भादवी ३७९ |
| ११ | कोंढवा पोलीस ठाणे | ८३१/२०२३ भादवी ४५४ ४५७ ३८० |
| १२ | सासवड पो ठाणे पुणे ग्रामिण | ६१०/२०२३ भादवी ३७९ |

वरीलप्रमाणे गुन्हे उघड केले असुन आणखी तीन दुचाकी बाबत चा तपास चालु आहे.

सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री संदिप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ ५ पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे शहर.श्रीमती अश्विनी राख यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,मुंढवा पोलीस ठाणे पुणे,श्री विष्णु ताम्हाणे,पोलीस निरीक्षक (गुन्हे),मुंढवा पोलीस ठाणे पुणे,श्री.प्रदिप काकडे, तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक संदिप जोरे, दिनेश राणे,दिनेश भांदुर्गे,महेश पाठक,वैभव मोरे,राहुल मोरे,सचिन पाटील व स्वप्नील रासकर यांनी केली आहे.


मुंढवा पोलीस ठाणे
पोलीस स्टेशन
पुणे शहर